# छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्य

**गणेश अनिल सातपुते** राज्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. gas.rs.polsc@unishivaji.ac.in

---

**प्रस्तावन :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाची ललकारी ऐकली की, प्रत्येक माणसाचे मन आनंदाने, हर्षाने, उचंबळून येते. शिवरायांच्या जयघोषाची गगनभेदी गर्जना प्रत्येक माणसाच्या रोमारोमात भिनून तो माणूस आपल्या छातीचा कोट करून देशाच्या रक्षणासाठी सज्ज होतो. त्याचे बळकट भाऊस्फुरण पावतात आणि अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी पुढे सरसावतात. त्याच्या पिळदार स्नायू मधून सळसळणाऱ्या रक्ताने सारे बळ अंगी एकवटून तो माणूस त्याच्या सक्षम मुखातून 'हर हर महादेव' ही घोषणा आपसूकपणे बाहेर काढतो. मराठा रेजिमेंट असो की महार रेजिमेंट दोन्ही सैन्यातील तुकड्यांमधील सैन्याच्या तोंडी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा जयघोष आणि हर हर महादेव हे सिंहगर्जना असतेच. ०१ ऑक्टोबर १९४१ रोजी महार रेजिमेंट ची स्थापना झाल्यापासून या रेजिमेंटच्या सुरुवातीला जे घोषघीत गायले जात असे त्याची सुरुवात ही "वीर शिवाजी के बालक हम" या ओळीने होत. असे पुढे १९६३ मध्ये 'वीर शिवाजी' या शब्दा ऐवजी 'वीर भारत' हा शब्द वापरला जाऊ लागला. याचाच अर्थ वीर शिवाजी म्हणजे शिवाजी या शब्दाचा पर्याय भारत असा झाला म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण भारताच्या अस्मितेचे प्रतीक होते, आहेत आणि राहतील हे यातून स्पष्ट होते.

देवगिरीच्या यादवांचे राज्य नष्ट झालेले होते. महाराष्ट्र पारतंत्र्यात जाऊन इस्लामी राजवटीला प्रारंभ झालेला होता. मराठा सरदार कोणत्या न कोणत्या शाहीचा सेवक बनलेला होता. त्यातून त्यांच्यात गुलामगिरीची मानसिकता तयार झालेली होती. हे मराठा सरदार कोणत्या न कोणत्या शाहीसाठी आपापसात लढत होते. एकमेकांचे रक्त सांडत होते मात्र त्यांच्यापैकी कोणालाही आपले सिंहासन निर्माण करावे असे वाटले नाही. आपले स्वत: चे राज्य स्थापन करावे वाटले नाही. यांचे कारण त्यांची गुलामी करण्याची, चाकरी करण्याची मानसिकता तयार झालेली होती. तेव्हा १७ व्या शतकात शिवाजी महाराजांनी जे राज्य स्थापन केले ते त्याकाळच्या हिंदुस्थानात अस्तित्वात असलेल्या इतर अनेक राज्यांसारखे एक राज्य नव्हते. ते एक आगळेवेगळे राज्य होते. उत्तरेत मोगल बादशहाची मोगलशाही आणि तिच्या स्वामित्वाखाली रजपुतांची राज्ये होती. दक्षिणेत आदिलशाही, कुतुबशाही आणि कर्नाटकातील नायकांची राज्ये होती. अशाच राज्यांसारखे शिवाजी महाराजांचे राज्य होते की काय ? या प्रश्नाचे उत्तर नकारात्मक असेल तर त्याच्या आगळेपणाचा आपणास शोध घ्यावा लागेल. त्यासाठी त्या राज्याची उद्दिष्टे तपासून पाहावी लागतील; तसेच त्याची मूळ संकल्पनाही समजून घ्यावी लागेल.

**छत्रपती शिवाजी महाराजांची स्वराज्याची संकल्पना :**

**१) छत्रपती शिवाजी महाराजांचं वैज्ञानिक दृष्टीकोन** : भारताच्या इतिहासामध्ये स्वराज्याची संकल्पना सर्वात अगोदर छत्रपती शिवाजी महाराजांनी मांडली, याला सिद्धांतिक शास्त्रीय पुराव्यांचा आधार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्मिती करताना वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारला. उदाहरणार्थ : सुसज्ज अशा आरमाराची उभारणी केली. ज्या काळामध्ये पाण्यावरून प्रवास केला की धर्म बुडतो असे म्हटले जात होते. त्या काळात महाराजांनी धर्माचा, प्रथा-परंपरांचा विचार न करता छत्रपती शिवाजी महाराजांनी पाण्यावरून प्रवास तर केलाच ; पण सुसज्ज अशा आरमाराची उभारणी देखील उभारणी त्यांनी केली. महाराजांनी आपल्या विविध किल्ल्यावर वेगवेगळ्या तोपांची उभारणी केली. प्रजेच्या रक्षणासाठी, स्वराज्याच्या रक्षणासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी दारूगोळ्याचा वापर देखील केल्याचे दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या प्रत्येक मोहिमा या अमवस्याच्या भयाण रात्री राबविल्या. यातून त्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन दिसून येतो.

**२) स्वराज्य म्हणजे रयतेचे राज्य :** महाराष्ट्र पारतंत्र्यात जाऊन इस्लामी राजवटीला प्रारंभ झालेला होता. मराठा सरदार कोणत्या न कोणत्या शाहीचा सेवक बनलेला होता. त्यातून त्यांच्यात गुलामगिरीची मानसिकता तयार झालेली होती. हे मराठा सरदार कोणत्या न कोणत्या शाहीसाठी आपापसात लढत होते. एकमेकांचे रक्त सांडत होते मात्र त्यांच्यापैकी कोणालाही आपले सिंहासन निर्माण करावे असे वाटले नाही. आपले स्वत: चे राज्य स्थापन करावे वाटले नाही. यांचे कारण त्यांची गुलामी करण्याची, चाकरी करण्याची मानसिकता तयार झालेली होती. उत्तरेतील रजपुतांची राज्ये उदयपूर (मेवाड), जोधपूर (मारवाड), जयपूर, बिकानेर अशा नावाने इतिहासात नोंदली गेली आहेत. दक्षिणेतील आदिलशाही, निजामशाही आणि कुतुबशाही ही राज्ये त्या त्या घराण्याच्या संस्थापकांच्या नावाने प्रसिद्धीस आली आहेत. पण शिवछत्रपतींचे राज्य 'रायगडचे राज्य' अथवा 'भोसलेशाही' या नावाने पुढे न येता ते 'स्वराज्य', 'हिंदवी स्वराज्य', 'मऱ्हाठे राज्य' या नावाने ख्यात झाले आणि त्याची कीर्ती 'मराठेशाही'च्या नावाने सर्वदूर पसरली. असे हे जगावेगळे घडले, याचे कारण शिवछत्रपतींना केवळ आपल्या भोसले घराण्याचे राज्य स्थापन करायचे नव्हते; त्यांना आपल्या सर्व स्वकीय बांधवांसाठी, महाराष्ट्रातील भूमिपुत्रांसाठी राज्य निर्माण करायचे होते. म्हणूनच त्यांनी आपल्या राज्यास 'स्वराज्य' असे संबोधिले. स्वराज्य म्हणजे महाराष्ट्रातील भूमिपुत्रांचे त्यांच्यासाठी उदयास आलेले राज्य रयतेचे राज्य होय.

**३) सामाजिक न्यायचे तत्व :** शिवाजी महाराज हे सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या स्वराज्यामध्ये समाज विभागातक प्रथांना मज्जा होता. स्त्रियाविरुद्ध असलेल्या दृष्ट प्रथांना प्रतिबंध होता. महाराजांच्या स्वराज्यामध्ये आपणास कुठेही स्थितीची चाल ही प्रथा अस्तित्वात असल्याचे दिसून येत नाही. तसेच अस्पृश्यता पालन केल्याचे आपणास आढळून येत नाही. महाराजांनी स्वराज्याची उभारणी करताना वतनदारी पद्धत बंद केली. शिवछत्रपतींनी देशमुख-देशपांडेपासून

पाटील-कुलकर्णांपर्यंत सर्व लहानमोठ्या वतनदारांची वतने खालसा करून टाकली. त्यांची इनामे सरकारजमा केली; आणि ते सरकारी काम करत त्या मोबदल्यात त्यांना रोख वेतन द्यायला सुरुवात केली. स्वराज्यातील रयतेची शेकडो वर्षे चालू असणारी पिळवणूक शिवछत्रपतींनी थांबवून ही एक प्रकारची सामाजिक क्रांतीच केली. ज्याला आपण आज 'सामाजिक न्याय' असे म्हणतो, तो त्यांनी १७ व्या शतकात प्रस्थापित केला होता.

**४) आर्थिक स्वावलंबनाचे तत्व** : छत्रपती शिवाजी महाराजांनी आपले स्वराज्य हे आर्थिक बाबतीत स्वयंपूर्ण केले. त्यासाठी त्यांनी शेतकऱ्यांना खते, बी-बियाणे, बैल जोडी, अवजारे याचाही पुरवठा केला. प्रसंगी महाराजांनी शेतकऱ्यांना कर्जही देऊ केली. यातून उत्पन्न व्यवस्था आणि सार्वत्रिक किंवा सामूहिक कल्याणाचे सूत्र महाराजांनी रुजवून आपले स्वराज्य हे आर्थिक बाबतीत स्वयंपूर्ण केले. त्यासाठी त्यांनी शेतकऱ्याच्या भाजीच्या बेटालाही हात लागता कामा नये अशी कठोर भूमिका घेतलेली दिसून येते.

**५) समन्यायी स्वराज्याचे तत्त्व** : छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची उभारणी करताना राजकीय क्रांती घडवून आणली. त्यासाठी महाराजांनी पाटील, कुलकर्णी, देशमुख यांच्या वतनदाऱ्या नष्ट केल्या. त्यांचे अधिकार कमी करून सर्वसामान्य जनतेची त्यांच्याकडून होणारी पिळवणूक, त्यांच्याकडून सर्वसामान्य जनतेवरती केले जाणारे अन्याय अत्याचारचे शोषण थांबवले. त्यातून कल्याणकारी राज्याची निर्मिती करीत असताना कायद्याचे राज्य, रयतेचे राज्य निर्माण करून महाराजांनी समन्यायी स्वराज्य स्थापन केल्याचे दिसून येते.

**६) सार्वभौम स्वराज्याचेतत्त्व** : १७ व्या शतकात दिल्लीची मोगल बादशाहीच हिंदुस्थानात सार्वभौम सत्ता समजली जात होती. कोणी हिंदू राजा सार्वभौम सत्ता स्थापन करू शकत नव्हता. कारण हिंदू धर्ममार्तंडांनीच तशी बंदी केलेली होती. परशुरामाचा पृथ्वी निःक्षत्रिय सिद्धांत पुढे करून ब्रह्मवृंदांनी मुळात पृथ्वीवर कोणी क्षत्रियच शिल्लक राहिलेला नाही, असा पुकारा केला होता. यामुळे देशातील हिंदूंच्या क्षात्रतेजाचे खच्चीकरण झाले होते. विशेष म्हणजे या हिंदू धर्ममार्तंडांना उत्तरेतील मोगल बादशहा. आणि दक्षिणेतील सुलतान 'राजा' म्हणून स्वीकारार्ह वाटत होते. पण आपलाच राजा त्यांना मान्य होत नव्हता. शिवछत्रपतींनी राज्याभिषेक करवून हा आपल्याच लोकांचा आत्मघातकी विचार निकालात काढला. रायगडावरील शिवराज्याभिषेक हा महाराष्ट्राच्या क्षात्रतेजाचा व अस्मितेचा एक महान आविष्कार होता. मराठ्यांचे राज्य छोटे असेल, पण सार्वभौमत्वाच्या निकषावर ते मोगल बादशाहीच्या बरोबरीचे आहे. असेच शिवछत्रपतींनी अखिल हिंदुस्थानास घोषित केले. राज्याभिषेकाने शिवछत्रपतींच्या स्वराज्याची संकल्पना अधिक स्पष्ट व रेखीव बनली. तिला घटनात्मक व नैतिक अधिष्ठान प्राप्त झाले. प्रत्येक मराठ्यांच्या हृदयात तिला कायमचे स्थान मिळाले.

**७) स्वराज्य राष्ट्रानिर्मितीची तत्त्व** : कोणत्याही देशाचा राष्ट्रनिर्माता हा त्याला निर्माण करावयाच्या राष्ट्राचे स्वप्न प्रथम पाहतो आणि मग ते स्वप्न आपल्या अनुयायांसमोर उभे करतो. या स्वप्नांच्या विचाराने तो त्यांना भारावून सोडतो. जगाच्या इतिहासात अशी अनेक उदाहरणे आहेत. इटलीमध्ये जोसेफ मॅझिनीने एकात्म स्वतंत्र राष्ट्राचे स्वप्न पाहिले; असेच स्वप्न जर्मनीत बिस्मार्कने पाहिले. आशिया खंडात चीनमध्ये माओने ते पाहिले. फार कशाला आपल्या देशात म. गांधींनी असेच स्वप्न पाहिले नव्हते काय? तेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या मराठा सैनिकांची कोणत्यातरी शाहीचा सेवक किंवा वतनदार ही ओळख नष्ट करून टाकली. त्यांनी या मावळ्यांना मराठा सैनिकांना स्वराज्याचे स्वप्न महत्वाकांक्षा दिली. स्वत:चे राज्य स्थापन करणारे त्यासाठी प्रसंगी शत्रूवर वर करणारे अशी ओळख त्यांनी या मराठा सैनिकांना दिली. ही मराठा राष्ट्रानिर्मितीची प्रक्रिया होती ज्यामुळे स्वराज्य स्थापन झाले. ३५० वर्षापूर्वी शिवछत्रपतींनी राष्ट्रानिर्मितीचे बीज आपल्यात रुजवले होते. त्यामुळेच इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी राष्ट्रवादी स्वातंत्र्य चळवळ पुढे जाऊन उदयास आली असे म्हणता येते.

**८) स्वराज्य हेच खरे सुराज्य** : स्वराज्याच्या निर्मिती मागची आपली भूमिका शिवछत्रपतींनी आपल्या एका आज्ञापत्रात अत्यंत स्पष्ट शब्दांत मांडली आहे. स. १६७४ साली मराठ्यांच्या लष्कराची छावणी कोकणात होती. छावणीसाठी लागणारा दाणागोटा, गवतचारा इत्यादी गोष्टींची सर्व व्यवस्था केली गेली होती. पण छावणीतील लोकांनी या गोष्टींची उधळमाधळ केली तर ऐन पावसाळ्यात टंचाईचे संकट ओढवेल आणि मग आपले सैनिक रयतेच्या घरात शिरतील. धान्य, लाकूडफाटा जे काही मिळेल ते जबरदस्तीने ताब्यात घेतील. अशा स्थितीत रयत परागंदा होईल, हा इशारा देताना महाराज आपल्या आज्ञापत्रात म्हणतात "म्हणजे त्याला (रयतेला) ऐसे होईल की मोगल मुलकांत आले त्याहूनहि अधिक तुह्मी! ऐसा तळतळाट होईल! तेव्हा रयतीची व घोडियांची सारी बदनामी तुह्मांवरी येईल." यातील, मोगल मुलकात आले त्याहून अधिक तुम्ही, हे वाक्य फार महत्त्वाचे आहे. 'स्वराज्य' आणि 'परराज्य' यातील फरक अगदी मोजक्या शब्दांत महाराजांनी सांगितला आहे. स्वराज्याचे सुराज्य कसे झाले पाहिजे, ही शिवछत्रपतींच्या स्वराज्याची कल्याणकारी संकल्पना इथे स्पष्ट होते आहे.

**सारांश** : १७ व्या शतकात शिवाजी महाराजांनी जे राज्य स्थापन केले ते त्याकाळच्या हिंदुस्थानात अस्तित्वात असलेल्या इतर अनेक राज्यांसारखे एक राज्य नव्हते. ते एक आगळेवेगळे राज्य होते. उत्तरेत मोगल बादशहाची मोगलशाही आणि तिच्या स्वामित्वाखाली रजपुतांची राज्ये होती. दक्षिणेत आदिलशाही, कुतुबशाही आणि कर्नाटकातील नायकांची राज्ये होती. अशाच राज्यांसारखे शिवाजी महाराजांचे राज्य होते की काय ? या प्रश्नाचे उत्तर नकारात्मक असेल तर त्याच्या आगळेपणाचा आपणास शोध असताना छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व किती स्वच्छ, स्पष्ट, नैतिक होते हे दिसून येते. त्यामुळेच ते स्वराज्य केवळ निर्माण करून थांबले नाहीत तर ते स्वराज्य सुराज्य करण्यासाठी देखील त्यांनी महत्वाचे प्रयत्न केले. महत्वपूर्ण असे निर्णय घेतले. स्वराज्याची उभारणी

करत असताना आपल्या मावळ्यांना सैनिकांना विश्वासात घेतले, त्यांच्यात स्वराज्य निर्मितीचे स्वप्न रुजवले. त्यातून छत्रपती शिवाजी महाराजांची समूहभावना दिसून येते. स्वराज्य उभारताना त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार केला नि अंधश्रद्धेला, पूर्वग्रह दुषित दृष्टीकोनास नाकारले. स्वराज्य हे आपले स्वत:चे राज्य आहे असा विचार त्यांनी आपल्या रयतेमध्ये रुजवला. यासाठी महाराजांनी सामाजिक न्यायाचे तत्व अंगीकारून एक प्रकारची राजकीय क्रांतीच घडवून आणली. आपल्या स्वराज्याला आर्थिक बाबतीमध्ये स्वयंपूर्ण केले. त्यासाठी शेती शेतीची धोरणे व्यवस्थितपणे राबवली. कल्याणकारी राज्याची निर्मिती करीत असताना कायद्याचे राज्य, रयतेचे राज्य निर्माण करून महाराजांनी समन्यायी स्वराज्य स्थापन केल्याचे दिसून येते. सार्वभैम स्वराज्याची निर्मिती करून त्या स्वराज्याला घटनात्मक व नैतिक अधिष्ठान राज्याभिषेकाद्वारे प्राप्त करून दिले. त्यामुळेच पुढे जाऊन जेव्हा आपण इंग्रजांच्या राजवटीखाली पारतंत्र्यात गेलो तेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांमुळे इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी राष्ट्रवादी स्वातंत्र्य चळवळ पुढे जाऊन उदयास आली. शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे केवळ मराठ्यांचे किंवा केवळ हिंदूंचे नव्हते. शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यास कधी हिंदूंचे राज्य असे म्हटले नाही. ते स्वराज्य केवळ हिंदवी स्वराज्य आहे. या हिंदवी मध्ये फक्त हिंदूच नाही तर सर्व जातीधर्माची लोक येतात. सर्व भूमिपुत्रांचे राज्य म्हणजे स्वराज ही महाराजांची कल्याणकारी भूमिका होती जी कायमस्वरूपी अजरामर राहील.

**संदर्भ**

१) काळे दिनकर विनायक, (१९६०), छत्रपती शिवाजी महाराज, पुणे विद्यापीठ, पुणे.

२) बाळकृष्ण, (२०२३), महान शिवाजी, भाग २ (खंड तीन व चार), शाहू संशोधन केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

३) मोरे सदानंद, (२०१३), गर्जा महाराष्ट्र, सकाळ प्रकाशन, पुणे.

४) फडके य. दि., (२००७), विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड सातवा, मौज प्रकाशन, मुंबई.

५) साळुंखे आ. ह, (२०२१), शिवरायः संस्कार आणि शिक्षण, लोकायत प्रकाशन, सातारा.

६) ओतूरकर रा. वि., (१९८४), शिवराज्याभिषेक, मराठ्यांचा इतिहास (संपादक अ. रा. कुलकर्णी व ग.ह. खरे), महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर, पुणे.

७) पठाण इस्माईल, (२०२१), छत्रपती शिवाजी महाराज, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर.